शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र


# EPABX सिस्टिमसाठी वार्षिक देखभाल व दुरुस्ती निगराणी दरपत्रके सूचना

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये अंतर्गत संभाषणासाठी EPABX सिस्टिम कार्यरत आहे. सदर EPABX सिस्टिमची सन २०२५-२६ मध्ये वार्षिक निगराणी देखभाल व दुरुस्ती इ. कामासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्यासाठी दरपत्रके सिलबंद लिफाफ्यातून **मा. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांचे नावे **दि. २०/०९/२०२५** पर्यंत कार्यालयात पोहोचतील, अशा रितीने पोष्टाने अथवा समक्ष आणून द्यावीत. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

१. दर देताना ते सर्व करासह (आयकर, जी.एस.टी व इतर सर्व करासहित) देण्यात यावेत.
२. दरपत्रके बिनशर्त असले पाहिजेत.
३. दरपत्रके नोटीस सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार व अटीनुसारच पाठवावे.
४. दरपत्रके सिलबंद लिफाफ्यातून पाठवावे.
५. सदर सिलबंद लिफाफ्यावर जाहिरात/पत्र संदर्भ क्रमांक व दिनांक इ. बाबींचा उल्लेख करावा व सदर लिफाफ्यावर (**EPABX सिस्टीम वार्षिक देखभाल व दुरूस्ती निगराणी दरपत्रक : दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**) असा स्पष्ट उल्लेख करावा.
६. कोणतेही दरपत्रक अगर सर्व दरपत्रके कारण न देता मंजूर अगर नामंजूर करण्याचा हक्क कार्यालयाने राखून ठेवला आहे.
७. दरपत्रके ही विद्यापीठाच्या आवक विभागात पोस्टाने विहित मुदतीत व कार्यालयीन वेळेत पोहचतील अशी पाठवावी अथवा समक्ष विद्यापीठाच्या आवक विभागात आणून द्यावीत.
८. सदर कालावधीत Telephone EPABX देखभाल करण्यासाठी आपला अधिकृत इंजिनियर किमान महिन्यातून एकदा पाठविणेचा आहे.
९. Telephone EPABX सिस्टीममधील उद्‌भवलेल्या समस्याचे निराकरण करण्यासाठी कार्यालयाकडून बोलावणे आल्यानंतर २४ तासाचे आत कार्यालयीन वेळेत येणे बंधनकारक आहे.
१०. वार्षिक दर करारानुसार देखभाल व दुरूस्ती जास्तीत जास्त दोन दिवसात पूर्ण करून देणे आवश्यक आहे. याबाबतची पूर्तता होत नसल्यास तसे कार्यालयास कारणासह सत्वर लेखी स्वरूपात कळविणे बंधनकारक राहिल.
११. सर्वसमावेशक वार्षिक देखभाल करारामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.
    अ. वार्षिक दुरूस्ती विनामुल्य
    ब. पुरक साधने बदलून देणे
    क. सामान्य उपयोगातून दोष/दुरूस्ती निर्माण झाल्यास पूर्ण करणे.
१२. पुरवठा आदेशानुसार वार्षिक देखभाल कराराची रक्कम कामाची पूर्तता झालेनंतर कामाचा अहवाल पाहून दरपत्रकाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर देणेत येईल.
१३. वार्षिक देखभाल दुरूस्ती कामाचा अहवाल असमाधानकारक आल्यास रक्कम अदा केली जाणार नाही.
१४. वार्षिक देखभाल करारामध्ये नैसर्गिक आपत्तीतून - भूंकप, महापूर, अतिउच्च, कमी जास्त व कमी विद्युत दाब या कारणास्तव उद्‌भवलेली समस्यांची दुरूस्ती करणे व भाग बदलून देणे बंधनकारक नाही.
१५. वार्षिक देखभाल करार हा एक वर्षापर्यंत बदलता येणार नाही.

१६. आपणास दिलेले काम हे संबंधित फर्म्स/व्यक्ती यांनी करणे बंधनकारक असून सदरचे काम हे त्रयस्थ फर्म्स/व्यक्तींकडे देवू नये.

१७. कामाच्या पुरवठा आदेशापोटी अॅडव्हान्स रक्कम दिली जाणार नाही.

१८. देयक सादर करताना मा. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नावे अॅडव्हान्स स्टॅम्प रिसीटसह दोन प्रतीत द्यावे लागेल.

१९. दरपत्रके मान्य झालेनंतर संबंधित फर्म्स/व्यक्तीने रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर कार्यालयाने दिलेल्या विहित नमुन्यात करारपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२०. उपरोक्तबाबत कोणतीही समस्या उद्भवल्यास, त्यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार प्रशासनाचा राहिल.

२१. **दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने म्हणजे तांत्रिक व दराची याप्रकारे द्यावयाचे असून तांत्रिक लिफाफ्यामध्ये पॅन कार्ड, जीएसटी क्रमांक, कामाचे अनुभव प्रमाणपत्र, ग्राहकांची यादी इ. च्या छायांकीत प्रती सोबत जोडणेचे आहे. दराच्या लिफाफ्यामधून फक्त दरपत्रक द्यावयाचे असून ही दोन्ही बंद दरपत्रके एका मोठया लखोट्यामधून मा. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण, केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या नावे दि. २०/०९/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० पूर्वी पाठविण्यात यावीत.**

**लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा) -** पॅन कार्ड, जीएसटी प्रमाणपत्र, ग्राहकांची यादी

**लिफाफा क्र. २ (दराचा लिफाफा) -** दरपत्रक सोबतच्या नमुन्याप्रमाणे

दरपत्रकधारकाचा पत्ता ____________________

दरपत्रकधारकाचे नाव ____________________

____________________

मोबाईल क्र. ____________________

कोटेशन/दरपत्रके धारकांची सही, शिक्का व पूर्ण पत्ता

संचालक

जा.क्र. शिवाजी वि./दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणकेंद्र/ 554

दि. : 11 SEP 2025

# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

दिनांक :

प्रति,

मा. संचालक,
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय : "**EPABX** सिस्टीम वार्षिक देखभाल व दुरूस्ती निगराणी दरपत्रक"

संदर्भ : आपले संदर्भ क्र -------- दि.------------

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भिय पत्रानुसार माझ्या फर्म्सची/व्यक्तीची खालीलप्रमाणे दरपत्रक सादर करीत आहे.

| **Sr. No.** | **Particular** | **Total Cost in Rs. (including all taxes)** |
|---|---|---|
| 1 | Annual Maintenance Contract of Centre for Distance and Online Education's EPABX System | |

तसेच उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार कळविलेनुसार मला सर्व नियम व अटी मान्य आहेत.

कोटेशन/दरपत्रके धारकांची सही, शिक्का व पूर्ण पत्ता